INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February 2021

Special Issue 260 (B)

**Multidisciplinary Issue**



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

## PEER REFREED & INDEXED JOURNAL

February 2021

Special Issue 260 (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo (Source) : Internet – NASA's Perseverance Rover successfully touched down on Mars on Thursday, 18th February 2021.**

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Ñesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue -260 (B) - Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2021

## INDEX



| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | मांगेला समाज आणि बोली | प्रा. संदीप कदम | ०५ |
| ०२ | बौद्ध दर्शनाचा कर्मसिद्धान्त आणि योग दर्शनाचा कर्मसिद्धान्त-तुलनात्मक विवेचन | सुषमा कांबळे | ०९ |
| ०३ | गौतम बुद्धांच्या मराठी चरित्रातील मिथकांचे स्वरूप | डॉ.शिवाजी गायकवाड | १९ |
| ०४ | ज्ञानेश्वरीतील स्त्री दर्शन | श्री.संदीप तांबे, डॉ.शिरीष लांडगे पाटील | २२ |
| ०५ | लोकसंस्कृतीचा उपासक पोतराजाचे धार्मिक विधी | प्रा. माधवी पवार | २७ |
| ०६ | वेणास्वामींच्या स्फुट काव्यातील आत्मानुभूती | डॉ. सुरेश जाधव, सौ. शिल्पा शिवभक्त | ३२ |
| ०७ | मराठी ओवीगीतातील स्त्री चित्रण | डॉ. रामलीला पवार | ३७ |
| ०८ | वारकरी साहित्यातील 'समता' मूल्याचे दर्शन | श्री. जालिंदर येवले | ४२ |
| ०९ | लक्ष्मण महाराजांच्या अभंगातील नवविधा भक्ती | डॉ. प्रवीण कारंजकर | ४७ |
| १० | भटक्या विमुक्तांची जात -पंचायत व स्त्री प्रश्न | डॉ. अंजली मस्करेन्हस | ५३ |
| ११ | विश्वशांती व लोकसुधारणेची पाठशाळा : राष्ट्रसंतांची सामुदायिक प्रार्थना | डॉ. सतीश चहांदे | ५९ |
| १२ | डॉ. दिनकर गायकवाड यांच्या कवितेतील सामाजिकता | डॉ. सुनील निगडे | ६५ |
| १३ | प्रवासवर्णन वाङ्मयाचे स्वरूप | डॉ. गणपती मोरे | ६९ |
| १४ | 'अंतर्नाद' नियतकालिकाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये | श्री. शरद दुधाट | ७१ |
| १५ | महात्मा गांधी यांच्या शिक्षणविषयक विचारांची ज्वलंत प्रासंगिकता | डॉ. जी.डी. घोडे | ७८ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | डॉ. लता आंदे | ८३ |
| १७ | हमीद दलवाई यांचे मुस्लीम स्त्री सुधारक कार्य | डॉ. संदीप राऊत | ८८ |
| १८ | नामदेव ढसाळांच्या 'निर्वाणा अगोदरची पीडा' कवितासंग्रहातून व्यक्त झालेल्या जाणीवा : एक चिकित्सा | प्रा. सुरेश वर्धे | ९३ |
| १९ | समकालीन जीवन व्यवहार आणि भाषेचे बदलते स्वरूप | डॉ. गजानन भामरे | १०६ |
| २० | 'हुंडाभर चांदण्या' आणि ग्रामीण वास्तव | डॉ. विजय केसकर | १०९ |
| २१ | मराठी नाटकातील : जीवन संदर्भ काही निरीक्षणे | प्रा. आर. डी. कांबळे | ११४ |
| २२ | तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती | डॉ. सुवर्णा गाडगे | ११९ |
| २३ | निवडक दलित कथेतील सामाजिक व वाङ्मयीन जाणिवा | डॉ.के.के. अहिरे, प्रा.अरुण मोरे | १२५ |
| २४ | दलित आत्मकथन : दु:खद जीवनाचा आलेख | प्रा. काशिनाथ तरासे | १२९ |
| २५ | व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्ये | डॉ. धनराज धनगर | १३५ |
| २६ | क्रांतिसिंह नाना पाटील यांचे 'प्रतिसरकार' : एक अभिनव प्रयोग | डॉ. राजू सावंत | १४० |
| २७ | मराठेकालीन दुष्काळ व त्यावरील उपाययोजना | प्रा. आर. के. सूर्यवंशी | १४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | इ.स.१८५७ च्या उठावात खानदेशचा सहभाग | प्रा.जगन्नाथ गोपाळ | १५० |
| २९ | म. गांधीजींचा जळगाव जिल्ह्यातील जनतेवरील प्रभाव (सन १९२० ते १९४७) | डॉ. बाळकृष्ण पाटील | १५४ |
| ३० | आदिवासी विद्यार्थ्यांना गणितविषयाच्या अध्ययनात साहित्य हाताळताना येणाऱ्या अडचणी शोधून केलेल्या उपाययोजनांचा संपादणुकीवर होणाऱ्या परीणामांचा अभ्यास | प्रा. सौ. व्ही. व्ही. बाविस्कर | १६७ |
| ३१ | नागपूर जिल्ह्यातील मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची शैक्षणिक स्थिती | गणेश खवसे | १७२ |
| ३२ | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी पत संस्थांच्या पुनर्प्राप्तीची कामगिरी एक : चिकित्सक अभ्यास | पी. ए. दीक्षित, प्रा. डॉ. ए. आर. मुंगी, प्रा. डॉ. ए. वाय. दीक्षित | १७५ |
| ३३ | ग्रंथालयात माहितीचे व्यवस्थापन | डॉ. प्रशांत पगाडे | १८६ |
| ३४ | ग्रंथालय सुरक्षा : काल, आज आणि उद्या | प्रा. तुळजाराम खैरे | १९० |
| ३५ | प्राथमिक शाळांमधील दुर्गम भागातील मातांच्या सामाजिक, आर्थिक- स्थितीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास | डॉ. श्रीमती व्ही.व्ही. बाविस्कर | १९४ |
| ३६ | कन्नड सक्ती व महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्य | डॉ. एस. एन. कांबळे | २०० |
| ३७ | भंडारा जिल्ह्यातील तांदूळ पिकाच्या उत्पादकतेचे (कृषी कार्यक्षमतेचे) भौगोलिक अध्ययन | प्रा. हरिचंद्र कैताडे, डॉ. मेघा सावरकर | २०३ |
| ३८ | कोविड-१९ चा भारतीय शेतीवरील परिणाम | डॉ. विजय शिंदे | २१० |
| ३९ | कोविड-१९ मुळे भारतातील आर्थिक सामाजिक व राजकीय कारणांचा गरीब कुटुंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर आणि खेळावर झालेला परिणाम एक अभ्यास | डॉ. गुणाजी नलगे | २१५ |
| ४० | मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची आर्थिक, सामाजिक स्थिती (नागपूर जिल्हा) | गणेश खवसे | २१९ |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue -260 (B) - Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2021

# हमीद दलवाई यांचे मुस्लीम स्त्री सुधारक कार्य

डॉ. संदिप म. राऊत
इतिहास विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
ता. मोर्शी, जि. अमरावतीण मोबा. नं. : 9404689783
ई–मेल : sandipmanoharraut@gmail.com

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अनेक समाज सुधारकांनी आपल्या कार्य कतृत्वाने भारतीय समाजातील प्रथा, परंपरा, रुढी, स्त्री–पुरुष समानता, स्त्रियांना शिक्षण, स्त्रियांना मानसिक गुलामगिरीतुन बाहेर काढण्याचे कार्य केले. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडित रमाबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडर या सर्व समाज सुधारकांनी हिंदू धर्मातील रुढी, प्रथा, परंपरा, स्त्रि–दास्यत्व या विषयी कार्य करुन नवसमाज निर्माण केला. परंतु हे सामाजीक बदल करतांना या समाजसुधारकांच्या सोबत हिंदू धर्मातील एका वर्गाचे प्रतिनिधीत्व होते. मात्र मुस्लीम धर्मातील स्त्रियांच्या सामाजीक सुधारणा घडवून आणत असतांना हमीद दलवाई यांना सर्व मुस्लीम समाजाच्या विरोधात जावे लागले. मुस्लीम समाजातील धर्मवादी नेतृत्वाने आधुनिकतेकडे घेवून जाण्याच्या विचाराला त्या काळात कडाडून आणि आक्रमक विरोध केला. या विरोधाला न जुमानता हमीद दलवाई यांनी आपल्या सामाजीक सुधारणेचा स्त्री हा घटक केंद्रबिंदू मानुन आपल्या संपुर्ण आयुष्यामध्ये ते अविरत झटत राहीले. त्यांचे मुस्लीम स्त्री सुधारणे विषयक कार्य पुढील प्रमाणे पाहता येईल.

हमीद दलवाई यांचा जन्म 29 सप्टेंबर 1932 ला रत्नागिरी जिल्हातील चिपळून तालुक्यातील 'मिरजोळी' या गावी झाला. माध्यमिक शिक्षण चिपळून ला झाले. 1951 ला मॅट्रिक परिक्षा पास झाले. मुंबईला जावून त्यांनी इस्माईल युसुफ कॉलेज व रुपारेल कॉलेज मध्ये शिक्षण घेतले. 1954 ते 1963 पर्यंत किरकोळ नोकऱ्या करित राहीले. त्यांनी अनेक सामाजीक संघटनेत कार्य केले. दरम्यान त्यांनी अनेक नियतकालीकातुन कथालेखन चालू ठेवले. 'लाट' हा त्यांनी एकमेव कथा संग्रह 1960 साली साधना प्रकाशनाने प्रकाशित केला. 1966 साली 'इंधन' या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. 1963 ते 1968 या काळात पत्रकारीता केली. 1968 नंतर मुस्लीम समाज सुधारणेचे कार्य करण्यासाठी त्यांनी नोकरी सोडली. हमीद दलवाई यांनी 1866 ते 1977 या काळात मुस्लीम सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून मुस्लीम समाजाला नवि दिशा दिली.[1]

मुस्लीम समाजात आधुनिक उदारमतवादी प्रवाह सुरु करणे, तरुणामध्ये चिकित्सक बुध्दी जागृत करणे, परंपरागत रुढींना जखडलेल्या समाजाचे प्रबोधन करणे. अस्पृशाहुनही अधिक पिडित अशा स्त्रियांची गुलामगिरीतुन मुक्तता करणे, समान नागरी कायदा करुन जाती–जमातीतील भिती पाडून टाकणे इत्यादी उद्दिष्टांसाठी त्यांनी समाजसुधारांना घडून आणण्यास सुरुवात केली.

हिंदू समाजात आधुनिक मानवी राष्ट्रवादाचे, धर्मनिरपेक्षेतेचे, समतेचे आणि आधुनिक मानवी मुल्यांचे प्रवाह बळकट होत होते. या पार्श्वभुमीवर भारतीय समाज प्रबोधनाच्या चळवळीत मुस्लीम समाज मागे राहिला तर समाजात अनेक समस्या निर्माण होतील आणि या प्रबोधनाचे समतोल उद्देश साध्य करण्यात अपयश येईल. ही जाणिव दलवाई यांना अस्वस्थ करित होती.

जगातील समाज प्रबोधनाच्या चळवळीचा प्रारंभ हा स्त्रीदास्यमुक्तीच्या मुल्यापासुन सुरु होतो. हा धागा विचारात घेवून दलवाई यांनी मुस्लीम महिलांच्या मानवी हक्काचा मुद्दा सर्वप्रथम हाती

घेतला. आपल्या साहित्य व कार्य विचार यातुन मुस्लीम समाजात जन–जागृती घडवून आणण्यात त्यांनी आपले जिवन समर्पित केले असताच त्यांचे निधन 3 मे 1977 रोजी झाले. त्यांच्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

- **मुस्लीम महिलांच्या समस्या :–**

मुस्लीम महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय–अत्याचाराचे प्रश्न मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातुन हमीद दलवाई यांनी मुस्लीम समाजासमोर व संस्कार दरबारी मांडून त्यांना वाचा फोडण्याचे काम केले. परंतु उलेमांनी शरीयत 'दैवी' म्हणुन अपरिर्वतनिय आहे, अशी भूमीका घेवून या प्रयत्नांना सतत विरोध केला. जगात अनेक मुस्लीम राष्ट्रांनी शरियत कायदात कालसुगंत बदल करुन एका दमात तीन तोंडी तलाक देण्यास प्रतिबंध करण्याचे कायदे केलेले आहेत.

ब्रिटिशांनी लागू केलेल्या 1937 च्या मुस्लीम व्यक्तीगत कायद्यातही शरियतचा बहुतेक भाग रद्द करुन तलाक, बहुपत्नीत्व, वारसा हक्क, मूल दत्तक विधान एवढा पुरताच भाग ठेवला, हा कायदा सुध्दा मुस्लीम महिलांवर अन्याय करणारा आहे. त्यासाठी हमीद दलवाई यांनी प्रथम समान नागरी कायदा, तोंडी तलाक पध्दती, तलाक नंतर तलाक पिडितांचे प्रश्न, वारसा हक्क, हलाला पध्दती याविषयी आवाज उठवला.[2]

- **'तलाक' ची अमानुष पध्दती :–**

धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय चालीरिती, रुढी यांच्या विरुध्द लढण्याचे कार्य हे हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातुन केले. अशा अनेक प्रश्नापैकी सर्वात अन्याय गोष्ट म्हणजे स्त्रियांना तलाक देण्याची पध्दत होय. अस्तित्वात असलेल्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्याप्रमाणे पतीने पत्नीला 'तलाक' असे तीन वेळा म्हटले किंवा नोटीस पाठवली तरी, तलाक अमलात येतो आणि तीन वेळा 'तलाक' या शब्दाचा उच्चार केल्याबरोबर तो शब्द मुस्लीम स्त्रीला रस्तावर फेकतो. अशावेळी स्त्रीला माहेर रक्कम दिली जाते ती सुध्दा पतीतील सहजा सहजीरित नाही. कोर्टात जावे लगते. हे घडत असतांना मुला–बाळांची दुर्दशा होते. पत्नीला मात्र पतीपासून तलाक घेण्यासाठी कोर्टात जावे लागते. असा हा विचीत्र न्याय आहे. हा अन्यायी कायदा बदलून घेण्यासाठी हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे कार्य करत राहीले. तलाक या प्रथे विरोधात आवाज उठवला.[3]

- **हमीद दलवाई यांच्या नेतृत्वात प्रथम महिला मोर्चा :–**

जगातील समाजप्रबोधानाच्या चळवळीचा प्रारंभ हा स्त्री दास्यमुक्तीचा मुल्यापासून होतो. हा धागा विचारात घेवून हमीद दलवाई यांनी मुस्लीम महिलांच्या मानवी हक्काचा मुद्दा सर्वप्रथम हाती घेतला. दि. 18 एप्रील 1966 रोजी आपली पत्नी, बहीन आणि इतर पाच महिला अशा सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढुन मुस्लीम महिलांच्या तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला, मूल दत्तक घेण्यास असणारा मज्जाव या अन्याया विरोधी इस्लामचा इतिहासात पहिला आवाज उठवला आणि समान नागरी कायद्याची मागणीचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना दिले. तसेच मुस्लीम महिलांना आपल्या हक्काची जाणीव करुन देण्यासाठी 1968 मध्ये हमीद दलवाई यांनी "सदा. ए. निसवॉ" (महिला हक्क) या नावाची मुस्लीम महिलांची संघटना स्थापन करुन स्त्रीयांनी घराबाहेर पडून समान नागरी कायदा व्हावा म्हणुन मोर्चे, सभा, सम्मेंलने, घेतले याविषयी त्यांच्यावर आरोप सुध्दा घेण्यात आले. तरीसुध्दा न डगमगता दलवाई यांनी आपले कार्य चालू ठेवले. त्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता दिल्ली, अलिगढ, हैदराबाद, कलकत्ता या ठिकाणी सुध्दा पोहचले.

1970 मध्ये हे कार्य पुढे चालू राहण्यायसाठी, मुस्लीम सत्यशोधक मंडळ स्थापन करुन मुस्लीम स्त्री सुधारणा चळवळीला व्यापक स्वरुप देण्याचे कार्य केले.[4]

- **मुस्लीम सत्यशोधक मंडळाव्दारे स्त्री सुधारणा कार्य :–**

सन 1866 ते 1970 हा काळ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा स्थापन होण्याचा काळ होता. या काळात मुस्लीम महिलांच्या प्रश्नाववरील मोर्चा, अभ्यास दौरे, संवाद अभियान, वैचारीक पुस्तकाचे लेखन, लेखमाला पत्र हे सर्व बुध्दीजिवी वर्गात मर्यादीत राहत होते. पण ज्या समाजासाठी कार्य करायचे होते. तो समाज उदासीन, जैसेथे, प्रभावहीन होता म्हणुन हमीद दलवाई यांना मुस्लीम समाज केंद्री संघटना उभारणे जास्त महत्वाचे वाटले. यासाठी त्यांना समाविचारी भाई वैद्य, बाबा आढाव याच्या सह साधना व समाजवादी परिवारातील विचारवंताचे सहकार्य लाभले.

दि. 22 मार्च 1870 रोजी साधना कार्यालयात झालेल्या ऐतिहासीक बैठकीत डॉ. बाबा आढाव यांनी या संघटनेला. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' हे नाव सुचवले, नंतर या मंडळाचे अध्यक्ष हे ए.जे. शेख हे आरंभी अध्यक्ष होते नंतर बाबूमिया बॅंडवाले हे अध्यक्ष राहीले. मुस्लीम सत्यशोधक मंडळात अनेक सहकारी हमीद दलवाई यांना भेटले. सय्यदभाई दलवाई, हुसेन जमादार, वजीर पटेल, अब्दुल कादर मुकदम, महमद सोलापुरे, निसार बाटलीवाला, तसेच दलवाई यांच्या निधनानंतर शमसुद्दीन तांबोळी, रजिया सुलताना, मेहरुनिसा दलवाई, कुलसुम पारेख, असफ फैजी इत्यादी अनेक बुध्दीजीवी व्यक्तीचे योगदान मुस्लीम सत्यशोधक मंडळाला लाभले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभीच्या काळात घेतलेले कार्यक्रम हे मुस्लिम महिलांना पुरुषप्रधान मानसिकतेतून मुक्त करुन त्यांना समानतेचा, संविधानात्मक हक्क मिळवून देणे, धर्मनिरपेक्षता व लोकशाही मुल्यांशी बांधिलकी म्हणुन समान नागरी कायद्याची मागणी, जमातवादी–विघटनवादी मानसिकते विरुध्द संघर्ष करुन मुस्लीम चिकित्सा करुन समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाण्यासाठी कार्यक्रम घेणे. मुस्लीम समाजाच्या ऐहीक विकासासाठी आधुनिक शिक्षण, प्रादेशिक भाषाचा सन्मान व स्वीकार आणि कुटूंबनियोजनासाठी लोकाआधार मिळवुन देणे यास प्राधान्य देण्यात आले. राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाच्या प्रस्थापने बरोबरच मुस्लीम समाज प्रबोधनासाठी पहिल्या दशकात अनेक कार्य सत्यशोधक मंडळाव्दारे घेण्यात आले. 8 एप्रिल 1970 ला मंडळाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या पंधरवाडयात मुस्लीम स्त्री व पुरुषाच्या सहयाचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना देण्यात आले. यात समान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली.

नोव्हेंबर 1971 मध्ये पुणे येथे मुस्लीम महीला परिषद घेण्यात येऊन यात सुमारे दोनशे महिला उपस्थित होत्या महाराष्ट्रातुन नव्हे तर दिल्ली, कलकत्ता, अहमदाबाद येथुन महिला प्रतिनिधी आलेल्या होत्या, मुस्लीम महिलांना गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठीच्या मागणीसाठी तत्कालीन राज्यपाल अलियावर जंग याची भेट घेवून समान नागरी कायद्यासाठी निवेदन दिले व मुस्लीम महीलांच्या हक्काची मागणी शासन दरबारात करण्यात आली. 1970 ते 77 या काळात हमीद दलवाई यांच्या नेतृत्वात अनेक स्त्रीयांच्या सुधारने संदर्भात कार्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केलीत. मात्र त्याच्या निधनानंतर सुध्दा मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुस्लीम स्त्री सुधारक कार्य हे बंद न पडता सतत चालु आहे. अनेक सभा, सम्मेलने परिषदा आयोजीत करुन मुस्लीम स्त्रीसुधारणा चळवळीच्या अनुषंगाने कार्य करित आहे.[5] यावरुन असे दिसून येते कि हमीद दलवाई हे नुसती संघटना स्थापन करुन थांबले नाही तर या संघटने तर्फे अनेक कार्य करुन स्त्री दास्यत्वाला वाचा फोडुन एक नवी दिशा मुस्लीम समाजासमोर तयार केली.

E-ISSN : 2348-7143
February 2021

- **मुस्लीम महिला परिषद (1971) :–**

हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली मुस्लीम सत्यशोधक मंडळाव्दारे मुस्लीम स्त्री सुधारण कार्यक्रम राबविल्या गेले. 1966 साली हमीद दलवाई यांनी सात मुस्लीम स्त्रीयांच्या मोर्चा विधानसभेवर काढून समान नागरी हक्काच्या मागणीचे निवेदन दिले होते तेव्हा अनेक लोकांनी दलवाई यांची चेष्टा केली होती. त्या सात महिलांच्या मोर्च्याचा व्याप 1971 साली राष्ट्रीय पातळीवरच्या मुस्लीम महिला परिषदेपर्यंत वाढला. ही हमीद दलवाई यांच्या कार्याची पावती दिसून येते.

26 व 27 डिसेंबर 1970 ला 'मुस्लीम महिला परिषद' घेण्याचे ठरले. यांच नेतृत्व महिलांनी कराव असे सुध्दा ठरले. त्यासाठी कु. नजमा शेख, कु. मरियम रिफाई, डॉ. सनीम आतार, कु. मुमताज मोमिन, कु शाहीन आतार यांची निवड करण्यात आली देशभर अनेक स्त्री पुरुष यांच्याशी संपर्क साधुन मुस्लीम महिला परिषदेचे निमंत्रण देण्यात आले. परिषदेच्या उद्घाटनाला बद्रुद्दिन तय्यबजी यांची पत्नी शरीफाबी तय्यबजी यांना सुरत वरुन निमंत्रण दिले. दिल्लीवरुन अनेक मुस्लीम विचारवंत आले. त्यामध्ये डॉ. अनिसुरहमान हे होय. या दोन दिवसाच्या परिषदेत दोनशे पन्नास महिला हजर होत्या. परिषदेत मुस्लीम महिलांना समान अधिकार मागणारा ठराव संमत करण्यात आला. या परिषदेत एस. एम. जोशी दोन दिवस पुर्ण वेळ उपस्थित होत. अनेक परिवर्तनवादी कार्यकर्ते व संघटनानी या परिषदेनत आपला सहभाग दिला. "मुस्लीम इतिहासात पहिल्यांदाच मुस्लीम महिला आपल्या अधिकारांची मागणी करत होत्या." या परिषदेच्या बातम्या पूर्ण देशर वर्तमान पत्रातुन पसरल्या, मुस्लीम महिला जाहीर पणे, संघटीतपणे पुरुषी अन्याया विरुध्द आवाज उठवत आहे. यांमुळे अनेक बंडखोर मुस्लीम पुरुषांनी या विरोधात आवाज उठवला. परिषदेत सामील झालेल्या महिलांवर बहिष्कार सुध्दा टाकण्यात आला. परंतु हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा मुस्लीम स्त्री सुधारणावादी कार्य चालुच राहीले.[6]

- **तलाकपीडित मुस्लिम महिला परिषद :– (23 नोव्हेंबर 1976)**

हमीद दलवाई यांच्या नेतत्वाखाली डिसेंबर 1971 ला न्याय, अधिकार, हक्क, मागणारी देशातील पहिली मुस्लीम महिला परिषद पार पाडली होती, तर 1976 साली त्याच पुणे शहरात सहा वर्षांनी तोच न्याय, अधिकार मागणारी जगातील पहिली 'तलाकपीडीत मुस्लीम महिला परिषद' ही होती. या परिषदेला तलाक पिडीत महिला हजर राण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाव्दारे परिषदेची माहित वर्तमान पत्रात देण्यात आली. परिषदेचे पत्रके शहरात अनेक ठिकाणी वाटण्यात आले. परिषद यशस्वी होण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी कार्य केले. या परिषदेला अनेक विरोधक सुध्दा हजर होते. पुणे शहरातील मुस्लीम वकील सुध्दा हजर होते, सभागृहात तलाक पिडीत महिलांची संख्या ऐवढी वाढली की पुरुषांना महिलांना जागा द्यावी लागली. या परिषदेच्या अध्यक्षा म्हणुन ॲड. नजमा शेख या होत्या. परिषदेच्या उद्घाटन म्हणुन प्रा. कुलसुम पारीख या होत्या. जैनबबी हया ग्रामीण भागातील प्रमुख महिला होत्या. त्या वर्तमान पत्रातील माहिती वाचून या परिषदेला आपला वीस वर्षीय तलाक पीडीत मुलीला घेवुन आल्या होत्या.

परिषदेमध्ये अनेक तलाक पिडीतांची भाषणे झाली. या महिलांमध्ये तलाक पिडीता हया अठरा, एकोणविस, या वयोगटातील होत्या. त्यांचे दुःख त्यांनी मांडले सईदा खान या एकवीस वर्षीय तलाक पीडीतांनी परिषदेचा ठराव वाचून दाखवला. तलाक पीडीत महिलांच्या अनुभव कथनामुळे परिषदेचा पुर्ण नुर पालटून गेला. वकीलांनी सुध्दा मोफत तलाक पिडीतांच्या केस लढवू असे म्हटले. अशा

रितीने तलाक पिडीतांची मुस्लीम महिला परिषद पार पडली. हमीद दलवाई यांनी निर्माण केलेल्या रोपट्याच वटवृक्षात रुपांतर या परिषदेने करण्यात आले. हे हमीद दलवाई यांच्या कार्याची छाप होती.[7]

प्रस्तुत लेखामध्ये हमीद दलवाई यांनी सुरु केलेल्या मुस्लीम स्त्री सुधारणा चळवळीचे रुपांतर मोठया चळवळीत होवून ही चळवळ राष्ट्रीय पातळीवर मुस्लीम सत्यशोधक मंडळाव्दारे कार्य करित आहे.

भारतातील प्रसिध्द इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यांनी संपादीत केलेले 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' (आधुनिक भारताचे शिल्पकार) हे पुस्तक 2010 मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकात समाविष्ठ असणाऱ्या भारतातील 21 मान्यवरांमध्ये हमीद दलवाई यांचा समावेश आहे. ही हमीद दलवाई यांच्या कार्याची प्रचीती आहे.

डॉ. नरेंद्र दाभोळकरांना दलवाईंच्या कार्यबद्दल आकर्षण होते. धर्माकडे चिकीत्स दृष्टीने पाहून समाजात, बुध्दीप्रामाण्य, मानवतावादी, विवेकवादी, विचार रुजविण्याच्या दलवाईच्या प्रबोधनाचा वारसा कायम लक्षात राहावा म्हणुन दाभोळकरांनी आपल्या मुलांचे नाव 'हमीद' ठेवले. यावरुन असे दिसुन येते की हमीद दलवाई यांनी मांडलेला हा विचार मुस्लीम समाजा पुरता मर्यादीत न राहता तो राष्ट्रीय स्वरुपाचा बनला होता. हमीद दलवाई यांच्या कार्याबद्दल पु.ल.देशपांडे म्हणतात. महाराष्ट्रातल्या समाजप्रबोधनाच्या इतिहासाला महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हमीद दलवाई ही नावे अत्यंत आदराने उच्चारुनच प्रबोधनाचा विचार करावा लागेल. किंबहुना, महात्मा फुलेनी सुरु केलेल्या समाज प्रबोधनाच्या संपुर्ण इहवादी आणि माणुसकी हाच धर्म मानायला हवा. या विचार वृक्षला आलेले "हमीद दलवाई" हे खरे रसरशीत फळ आहे.


- संदर्भग्रंथ सूची :–

1. तांबोळी, शमसुदि्दन, 'हमीद दलवाई कांतीकारी विचारवंत,' डायमंड पब्लीकेशन, पुणे, आवृत्ती एप्रिल 2014, पृष्ठ क. 15, 16.
2. संपा. तांबोळी, शमसुद्दीन, 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका', वर्ष 6 अंक जाने, फेबु, मार्च 2020, पृष्ठ क. 140.
3. तांबोळी, शमसुदि्न, 'हमीद दलवाई कांतीकारी विचारवंत', डायमंड पब्लीकेशन पुणे, आवृत्ती एप्रिल 2014, पृष्ठ क. 58.
4. दलवाई मेहरुन्निसा, 'ॲंग्री यंग सेक्युलॅरिस्ट', साधना प्रकाशन पुणे, आवृत्ती जुलै 2016, पृष्ठ क. 76, 77.
5. संपा. विनोद शिरसाठ, 'साप्ताहिक साधना' 18 जानेवारी 2020, पृष्ठ क. 19, 20.
6. सय्यदभाई, दगडावरची पेरणी, अक्षय मानव प्रकाशन, पुणे, आवृत्ती डिसेंबर 2019, पृष्ठ क. 70, 75.
7. सय्यदभाई, दगडावरची पेरणी, अक्षय मानव प्रकाशन, पुणे, आवृत्ती डिसेंबर 2019, पृष्ठ क. 87, 88, 89.